विविध स्तरावरील शासकीय समित्यांवर
विधानपरिषद सदस्यांना प्रतिनिधीत्व देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : समिती-५०१३/प्र.क्र.१०९/तीन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : - २३ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

1) शासन पत्र (गुप्त), सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- डीआयएम-१२६९/एच, दि. ५ फेब्रुवारी १९७०
2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एमआयएस -१७७३/१७०५-बी, दि. ४ डिसेंबर १९७४
3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-१०८०/२८, दि.२६ सप्टेंबर १९८०
4) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. समिती-१०८६/८८२/२९. दि. ६ मे १९८६
5) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. शासधो-३०९१/१०८३/२९. दि. ४ सप्टेंबर १९९१.

-: परिपत्रक :-

राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांतर्गत विविध प्रकारच्या तालुका, जिल्हा, विभागीय व राज्य स्तरावरील समित्यांवर मा. विधानमंडळ सदस्याच्या नेमणुका करण्यासंदर्भात सामन्य प्रशासन विभागाकडून यापूर्वी उपरोक्त संदर्भाधिन शासन पत्रान्वये व परिपत्रकांन्वये वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले असून अशा समित्या गठीत करताना, किमान एक विधानपरिषद सदस्य / विधानसभा सदस्य अनुसूचित जमातीतील नेमण्यात यावा, असे उक्त संदर्भाधिन अनुक्रमांक(२) येथील परिपत्रकान्वये निदेशित करण्यात आले आहे. तसेच, उक्त अनुक्रमांक (२) ते (५) परिपत्रकान्वये जिल्हा, विभागीय व राज्यस्तरावरील शासकीय समित्यांवरील सदस्यांच्या नियुक्त्या मा. मुख्यमंत्री महोदयांच्या पूर्वानुमतीने आणि तालुका स्तरावरील सदस्यांच्या नियुक्त्या संबंधित जिल्हा संपर्क मंत्र्यांच्या अनुमतीने करण्याबाबत निदेशित करण्यात आले आहे.

२. तथापि, उपरोक्त आदेशानुसार, विविध स्तरावरील शासकीय समित्या गठीत करताना, विधानपरिषद सदस्यांना प्रतिनिधित्व दिले जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. यास्तव सर्व प्रशासकीय विभागांना असे निदेश देण्यात येत आहेत की, तालुका स्तरावरील ज्या शासकीय समित्यांवर विधानसभा सदस्य हे ‘अध्यक्ष’ आहेत, अशा समित्यांवर संबंधित

मा.विधानपरीषद सदस्य ज्या ठिकाणी कायम वास्तव्यास आहेत, त्या तालुक्यातील मा. विधानपरीषद सदस्यांना संबंधित जिल्ह्याच्या मा. पालकमंत्री महोदयांच्या मान्यतेने 'सदस्य' म्हणून प्रतिनिधीत्व देण्यात यावे. तसेच, अशा समित्यांवर, शक्य असेल तिथे त्यांना 'सह अध्यक्ष' किंवा 'उपाध्यक्ष' म्हणून नियुक्त करावे.

३. जिल्हा, विभागीय व राज्य स्तरावरील शासकीय समित्यांवर मा. विधानसभा सदस्यांप्रमाणे मा.विधानपरीषद सदस्यांनाही पुरेसे प्रतिनिधीत्व देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने संबंधित प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करावी.

४. वरीलप्रमाणे परिच्छेद २ व ३ येथील आदेशानुसार कार्यवाही करताना, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन आदेशान्वये विहीत केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

५. उपरोक्त आदेशाचे सर्व संबंधितांनी कृपया काटेकोरपणे अनुपालन करावे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२७११३७३११९९१५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Gajanan Bhagwat

Digitally signed by Rajendra Gajanan Bhagwat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc7aabd81415b8f5527e47fcdf6cb267b325f7490f2a874918347994ab7f727a, serialNumber=d818186dee70df53c608510c8f5de9e22be5a193d4a6472ca4de45a568dc44a7, cn=Rajendra Gajanan Bhagwat
Date: 2019.08.27 11:48:21 +05'30'

(राजेन्द्र ग. भागवत)

सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद / मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.

२) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद / महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.

३) सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य (प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्यामार्फत) विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.

४) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई - ४०० ०३२.

५) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई - ४०० ०३२.

६) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री, यांचे खाजगी / स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

७) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.

९) सह सचिव, मा.मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) सर्व विभागीय आयुक्त, सर्व विभाग, महाराष्ट्र राज्य, (कोकण / पुणे / नाशिक / अमरावती / नागपूर / औरंगाबाद)

११) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे , महाराष्ट्र राज्य.

१२) सर्व जिल्हा परीषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य.

१३) निवडनस्ती / कार्या-तीन, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.